जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०१/२०२४
## दि.२८/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ५१/२०२४,भादविक ३०७,५०४,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ०७ |
| **फिर्यादी** | किरण खुडे,वय-२० वर्षे,रा.खडकी बाजार,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०१/२०२४ रोजी १७/०० वा.राजीव गांधी नगर गणपती मंदीरा समोरील सार्वजनिक शौचालया जवळ खडकी बाजार,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संनगमत करून,पुर्वी झालेल्या वादाचे करणावरून फिर्यादी यांना चाकुने वार करून,त्यांचेवर प्राणघातक हल्ला करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच सदरचे वाद सोडविण्यास आलेल्या तेथील नागरीकांना धमकावुन,सदर परिसरात दहशतीचे वातावरण तयार केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष भांडवलकर ९७६६६९३३३६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १८/२०२४,भादविक ३९४,३९७,३४,आर्म अॅक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक ,वय-२२ वर्षे,रा.लेन नं.०१,साईबाबा नगर,कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०१/२०२४ रोजी १९/०० वा.इशा चेबर्स,होप हॉस्पिटल समोर,पत्रा चाळी जवळ,भवानी पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र कासीफ खान याचेसह गॅरेज मध्ये त्यांचे दुचाकीचा ड्रम आणण्यासाठी गेलो असता,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना परसो तुजे मस्ती आयी थी क्या असे बोलुन,हाताने मारहाण करुन,त्यांचेकडील धारदार हत्याराने फिर्यादी यांचे उजव्या हाताच्या पोटरीवर व डोक्यावर मारुन जखमी करून,फिर्यादी यांचे गळयातील ३०,०००/- रूपये किंची सोन्याची चेन जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दिपक यादव ९६८९८९०२६१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २८/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोटार वाहन का.क.१८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | धनराज कांबळे,वय-३६ वर्षे,रा.२२६,मंगळवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | रिक्षावरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०१/२२४ रोजी सकाळी ०८/३० वा.जुना बाजार शिवाजी आखाडा गेट नं.०२ समोरील वीर संताजी घोरपडे पथ या सार्वजनिक रोडवर |

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील काळुराम बळी कांबळे,वय-६५ वर्षे,रा.२२६,मंगळवार पेठ,पुणे हें वीर संताजी घोरपडे पथ या सार्वजनिक रोडने पायी जात असताना,यातील नमुद रिक्षा वरील चालकाने त्याचे ताब्यातील रिक्षा ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी काळुराम बळी कांबळे यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, संतोष शिंदे ९९२३४३३८२०

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे १९५/२०२४,भादविक ३९२,३४१,३४

**फिर्यादी** एक नागरीक,वय-३९ वर्षे,रा.जोगेश्वरी वेस्ट,मुंबई

**आरोपीत** दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २८/०१/२०२४ रोजी सकाळी ०६/३० वा.सुहाना मसाला चौक,हडपसर इंडस्ट्रीयल एरिया,हडपसर,पुणे याठिकाणी

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय असुन,फिर्यादी यांचेकडील दोन कामगार हे त्यांचेकडील टेम्पो घेवुन फिर्यादी यांचे ट्रान्सपोर्टचा काही माल वितरीत करण्याकरीता जात असताना,यातील दोन अनोळखी इसमांनी आपसात संगनमकत करून,सदर कामगारांना अडवुन,त्यांना टेम्पो मधुन खाली खेचुन,टेम्पो मधील विविध प्रकारचे कपडे,दोन मोबाईल हॅण्डसेट व टाटा कंपनीचा इन्ट्रा व्ही-३० टेम्पो नं.एम.एच./०२/एफ.एक्स./२५३२ असा एकुण १२,२०,०००/- रू किचा ऐवज टेम्पोसह जबरी चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. अविनाश शिंदे ८९९९४७००१८

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे १६/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,४२७,मो.वा.का.कलम १८४

**फिर्यादी** पियुश गायके,वय-२१ वर्षे,रा.गारमाळ धायरी,पुणे

**आरोपीत** सुयश राजेद्रं इंडिस,वय-२१ वर्षे,रा.हिंगणे होम कॉलनी,कर्वेनगर,पुणे (मयत)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२८/०१/२०२४ रोजी पहाटे ०३/०० वा. कर्वे रोडवरील कॅनरा बँके समोरील डिव्हायडरला

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र उज्वल आहिरे याचेसह मोटार सायकलवरून तसेच यातील नमुद मयत इसम सुयश इंडिस हा त्याचे मोटार सायकलवर त्याचे पाठीमागे मित्र जखमी साहिल गुप्ते यास बसवुन,त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी त्याचे मोटार सायकल वरील नियंत्रण सुटुन,तो स्वतः कर्वे रोडवरील कॅनरा बँके समोरील डिव्हायडरला धडकुन, त्यामध्ये सुयश इंडिस व त्याचा मित्र साहिल गुप्ते हा गंभीर जखमी होवुन,सुयश इंडिस हा स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. त्याचप्रमाणे फिर्यादी यांनी त्यांचे दुचाकीचा अचानक ब्रेक दाबल्यामुळे फिर्यादी व त्यांचा मित्र उज्वल आहिरे हे दुचाकीवरून घसरून जखमी झाले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. करिश्मा शेख ८४६८८६०५५१

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे २९/२०२४,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय-६० वर्षे,रा.कोढवे-धावडे,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१०/०१/२०२४ रोजी १६/०० वा.मनपा बस स्टॉप येथे शिवाजीनगर,पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हया मनपा बस स्टॉप येथे शिवाजीनगर,पुणे येथे प्रवास करण्यासाठी पीएमपीएमएल बस मध्ये चढत असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे उजवे हातातील सोन्याची बांगडी १,५०,०००/- रु किची हातामधुन काढुन चोरी करून नेली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. विजय पानकर ९८९२७०९६४०

## दि.२९/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ६४/२०२४,भादविक ३०७,४२७,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३३,रा.पर्वती दर्शन,पुणे |
| **आरोपीत** | पाच इसम व त्याचे इतर दोन स-<br>ाथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०१/२०२४ रोजी रात्री १२/३० वा.चाळ क्रं.१०० च्या जवळ शिवराज मित्र मंडळ, पर्वती दर्शन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे राहते घरी कुटुंबासह असताना,यातील नमुद इसमांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी यांचा पुतण्या अथर्व शेडगे याचेशी दोन दिवसापुर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरुन,फिर्यादी व त्यांचे पती तसेच पुतन्या अथर्व शेंडगे यास जीवे मारण्याचे उददेशाने धारधार हत्यार व मोकळया बिअरच्या बाटल्या हातात घेवुन,आज तुम्हाला खल्लास करुन टाकतो असे म्हणुन फिर्यादी यांचे डोक्यावर जोराने धारधार हत्याराने मारले. त्यावेळी धारधार हत्यार हे फिर्यादी यांनी चुकविल्याने त्यांचे घराचे दरवाज्यावर लागला. त्यानंतर फिर्यादीचे घरा शेजारील त्यांचा पुतन्या अथर्व शेंडगे याचे घरावर देखील धारधार हत्याराने मारुन,त्यांचे घरा जवळील मोटार सायकली,रिक्षा,टेम्पोवर या वाहनांवर धारधार हत्याराने व बिअरच्या मोकळया बाटल्या फोडुन आजुबाजुचे वस्ती मध्ये दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मुळीक ८०७०००८९१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ६५/२०२४,भादविक ३२४,३४१,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९,महा.पो.का.क. ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१६ वर्ष,रा.लक्ष्मीनगर,पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०१/२०२४ रोजी रात्री ११/३० वा.चाळ नंबर १०० पर्वती दर्शन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,अथर्व शेंडगे यासोबत दोन दिवसापूर्वी झालेल्या वादाच्या कारणातून यातील नमुद इसमांनी फिर्यादीस अडवुन,माझ्याकडे का बघतो असे म्हणून फिर्यादी व त्यांचा मित्र देवेंद्र यांना शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण करून,त्यांचे हाता तील बांबुने फिर्यादी यांचे हातावर,पायावर मारुन त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कांबळे ९९२३१०७७५७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**